
ePaper
नरेंद्र मोदी स्टेडियम बॉम्बनं उडवण्याची धमकी, पाकिस्तानातून मेल
वर्ष - 8 । अंक - 275 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

विशेष संपादकीय
'ऑपरेशन सिंदूर' Controlled by नरेंद्र मोदीजी!
- पान 4



www.mahaenews.com | बुधवार, दि. 7 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकिस्तानात बहुसंख्य भागात आणीबाणी

# 'ऑपरेशन सिंदूर' चा हा तर फक्त ट्रेलर : लवकरच संपूर्ण पिक्चर!



### पाक सरकार, लष्कर आणि दहशतवाद्यांची घाबरगुंडी!

### भारताची मोठी तयारी सुरू, सैनिकांच्या सुट्ट्या रद्द, माजी सैनिकांनाही पाचारण, 18 विमानतळांवरील उड्डाणे रद्द !

**।नवी दिल्ली / श्रीनगर / इस्लामाबाद ।प्रतिनिधी । महाईन्यूज**

**भारताच्या लष्कराने हाती घेतलेले आणि यशस्वीपणे पार पाडलेले 'ऑपरेशन सिंदूर' ही फक्त दहशतवाद्यांना धडा शिकवण्यासाठी केलेल्या कारवाईचा 'ट्रेलर' होता, अजून मुख्य 'पिक्चर' जगाला पाहायचा आहे. माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी अशा प्रकारचे ट्विट करून लष्कराच्या व्यूहरचनेला पुष्टीच दिली आहे.**

### लाहोर, पंजाबात आणीबाणी

'ऑपरेशन सिंदूर' घाबरगुंडी उडालेले पाकिस्तानचे सरकार त्यांचे लष्कर आणि दहशतवादी यांना काय करावे ते सुचेनासे झाले आहे. त्यामुळे पाकिस्तानात बहुसंख्य भागात आणीबाणी जाहीर करण्यात आली असून दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनी आणीबाणीची घोषणा केली आहे. भारताच्या कारवाईमध्ये पंजाब प्रांताच्या चार प्रमुख शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले झाले आहेत. त्यामध्ये बहावलपूर, मुरीदके, सियालकोट आणि चक अमरू या शहरांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणचे दहशतवाद्यांचे अड्डे बेचिराख करून टाकण्यात आले आहेत.

### भारताचे गनिमी काव्याचे तंत्र..

पाकिस्तानची परिस्थिती अत्यंत वाईट असताना भारताने मात्र शिवरायांच्या गनिमी काव्याचे तंत्र अवलंबिले आहे. पाकिस्तान वरील कारवाईचा मोठा भाग अजून बाकी असल्यामुळे भारताची मोठी तयारी सुरू झाली आहे. याचाच एक भाग म्हणून सैनिकांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत तर माजी सैनिकांनाही तयार राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### बलुचिस्तान, पाकव्याप्त काश्मीरमध्ये दिवाळी..

भारताने अचानक केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मुळे आधीच पाकिस्तानला विरोध करणाऱ्या बलुचिस्तान आणि पाक व्याप्त काश्मीरमध्ये मात्र नागरिकांनी दिवाळी साजरी केली. अनेक ठिकाणी नरेंद्र मोदी यांचे मोठमोठे पोस्टर्स लावण्यात आले असून मिरवणुकाही काढण्यात आल्या आहेत. पाकिस्तानच्या जोखडातून लवकरात लवकर आमची सुटका करावी अशी घेतली नागरिकांनी नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी केली आहे.

### भारताची मोठ्या कारवाईची तयारी सुरू..

दिल्ली विमानतळावरून अनेक विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. दिल्लीचे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वात व्यस्त विमानतळ आहे. येथून दररोज सुमारे १३०० विमानांची ये-जा असते. त्याचप्रमाणे, श्रीनगर, जम्मू, लेह, चंडीगड, बिकानेर, जोधपूर, राजकोट, धर्मशाला, अमृतसर, भूज आणि जामनगरमधील उड्डाणे थांबवण्यात आली आहेत.

### मसूद अजहरच्या कुटुंबातील चौदा जणांचा खात्मा..

पाकिस्तानातील सर्वात कुख्यात दहशतवादी, संसद हल्ल्याचा मास्टरमाईंड मसूद अजहरच्या कुटुंबातील १४ जण मारले गेले आहेत. तसेच, मसूद अजहरचा भाऊ रऊफ असगर गंभीर जखमी आहे. मारल्या गेलेल्यां मध्ये मसूद अझहरचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वांटेड दहशतवादी रऊफ असगरचा मुलगा हुजैफा देखील आहे. जैश-ए-महम्मदचा प्रमुख मौलाना मसूद अजहरने सांगितले आहे की, भारताने बहावलपूरमधील जामिया मस्जिद सुभान अल्लाहवर केलेल्या हल्ल्यात त्याचे दहा कुटुंबीय आणि चार साथीदार मारले गेले. हा मसूद अजहर तोच आहे, ज्याला १९९९ मध्ये 'आय सी ८१४' विमानाचे अपहरण झाल्यानंतर भारताच्या तुरुंगातून सोडण्यात आले होते.

### सीमेवर तणाव मोदींचे दौरे रद्द

पाकमध्ये भारताने कारवाई केल्यामुळे सीमेवर तणाव वाढला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नॉर्वे, क्रोएशिया आणि नेदरलँड या तीन देशांचा दौरा रद्द केला आहे. देशाच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेतला गेला असावा, असे मानले जात आहे. माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी 'अभी तो पिक्चर बाकी है ।' असे ट्वीट केल्यामुळे याबाबतचा 'सस्पेन्स' आणखी वाढला आहे.


### 'ऑपरेशन सिंदूर' खास?

'ऑपरेशन सिंदूर' ने पाकिस्तानला मोठा संदेश दिला आहे. हे ऑपरेशन अनेक अर्थाने खास होते. पहिले म्हणजे, हा एक अचूक हल्ला होता. यात फक्त दहशतवाद्यांना लक्ष्य केले गेले. दुसरे म्हणजे, हा एक यशस्वी हल्ला होता. यात दहशतवाद्यांची अनेक ठिकाणे उद्ध्वस्त केली. तिसरे म्हणजे, हा एक निर्णायक हल्ला होता. याने पाकिस्तानला हा संदेश दिला की, भारत आपल्या सुरक्षेसाठी काहीही करू शकतो. 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताच्या लष्करी ताकतीचे आणि क्षमतेचे उत्तम उदाहरण आहे. भारताकडे जगातील सर्वात आधुनिक सेना आहे, हे यातून दिसून येते. या ऑपरेशनने भारताला एक मजबूत आणि जबाबदार देश म्हणून ओळख दिली आहे.

ePaper

**नरेंद्र मोदी स्टेडियम बॉम्बनं उडवण्याची धमकी, पाकिस्तानातून मेल**

| वर्ष - 8 | अंक - 275 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

**विशेष संपादकीय**



'ऑपरेशन सिंदूर' Controlled by नरेंद्र मोदीजी!

- पान 4

www.mahaenews.com | बुधवार, दि. 7 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जागतिक दबाव चुकवण्याच्या नापाक प्रयत्नांचा पर्दाफाश

# पाकिस्तानचा दुटप्पीपणा!

## 26/11 हल्ल्यातील मास्टरमाइंडचा पुन्हा उल्लेख, कोण आहे साजिद मीर?

| नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पाकिस्तानने मृत घोषित केलेला २६/११चा मास्टरमाइंड साजिद मीर अचानक जिवंत सापडला आणि त्याला २०२२ मध्ये अटक करण्यात आली. 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने साजिदचा उल्लेख केल्यामुळे पाकिस्तानचा दुटप्पीपणा आणि जागतिक दबाव चुकवण्याच्या प्रयत्नांचा पर्दाफाश झाला.**

भारताने बुधवारी पहाटे पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादाशी संबंधित ठिकाणांवर हवाई कारवाई केली. त्यानंतर २६/११च्या दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधार साजिद मीरचे पुन्हा एकदा नाव चर्चेत आले. या कारवाईनंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याच्या दुटप्पी धोरणावर प्रकाश टाकला. मिस्त्री यांच्या त्यांच्या वक्तव्यात साजिद मीरच्या प्रकरणाचा विशेष उल्लेख होता; ज्याला पाकिस्तानने एके काळी मृत घोषित केले होते; मात्र आंतरराष्ट्रीय दबावाखाली तो पुन्हा जिवंत आढळला आणि त्याला अटक करण्यात आली.

### काय म्हणाले मिस्त्री?

पाकच्या भारताविरोधातील सीमापार दहशतवादाला एक दीर्घ इतिहास आहे. साजिद मीर हे पाकिस्तानच्या दहशतवादावरील फसव्या भूमिकेचे ठळक उदाहरण आहे. एका मृत घोषित केलेल्या दहशतवाद्याला आंतरराष्ट्रीय दबावाखाली पुन्हा जिवंत दाखवले गेले आणि अटकही झाली, हे सर्व पाकिस्तानची रणनीती उघड करणारे आहे.

### साजिद मीर कोण आहे?

साजिद मीर हा पाकिस्तानी नागरिक असून, सन २००८मधील मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा मुख्य मास्टरमाइंड आहे. तो लष्करे तैयबाचा वरिष्ठ म्होरक्या असून, जागतिक स्तरावर त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारवायांचा प्रमुख मानला जातो.

अमेरिकन एजंट डेव्हिड कोलमन हेडलीची भरती साजिद मीरनेच केली होती.

'एफबीआय'च्या मीरने हेडलीला नाव बदलून दाऊद गिलानी केले.

सन २०११मध्ये अमेरिकेने मीरवर गुन्हा दाखल केला आणि २०१२मध्ये त्याचे नाव 'स्पेशली डिझिग्नेटेड नॅशनल्स'च्या यादीत समाविष्ट केले.

सन २०23मध्ये अमेरिका आणि भारताने त्याला जागतिक दहशतवादी घोषित करण्याचा प्रस्ताव राष्ट्रसंघात मांडला होता; मात्र चीनने तो रोखला.



### साजिद जिवंत कसा झाला?

'फायनान्शियल अॅक्शन टास्क फोर्स'चा दबाव वाढू लागल्यावर पाकिस्तानला साजिद मीरच्या अस्तित्वाचा कबुली द्यावी लागली. सन २०२२२मध्ये त्याला लाहोरमधील न्यायालयाने आर्थिक गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले आणि १५ वर्षांची शिक्षा सुनावली. त्याला ४.२ लाख पाकिस्तानी रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. पाकिस्तानने ही अटक 'फायनान्शियल अॅक्शन टास्क फोर्स'कडे सादर केली; जेणेकरून त्याला 'ग्रे लिस्ट'मधून बाहेर पडता येईल. मात्र, भारताने हे प्रकरण जगासमोर मांडले.

**खोटारडा पाकिस्तान! 'ऑपरेशन सिंदूर'नंतरचा प्रचंड चीड आणणारा व्हिडिओ समोर**
**दहशतवाद्यांना थेट शहीदांचा दर्जा?**



## रशियानंतर आता कतारचाही भारताला संपूर्ण पाठींबा



पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या कारवाईला आता रशियाने संपूर्ण पाठींबा दिलेला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात प्रचंड तणाव पसरला आहे. त्यात आता रशियाने भारताला मोठा पाठिंबा दिल्याने दिलासा मिळत असतानाच आता एका मोठ्या मुस्लीम देशाने भारताला फोन करुन पाठिंबा दिला आहे.कतारचे पंतप्रधान अमीर शेख तमीम बिन हमद अल-थानी यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी टेलिफोनवरुन चर्चा केली आहे.आणि पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारताच्या सर्व कारवाईला समर्थन दिले आहे. काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा बहुतांशी देशांनी निषेध केला आहे. अमेरिका आणि रशियासारख्या महाशक्तींनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर चर्चा करुन त्यांना पाठींबा दिला आहे. सोमवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दरम्यान फोनवर मोठी बातचीत झाली आहे. भारताच्या कारवाईला आता रशियाने संपूर्ण पाठींबा दिलेला आहे. आता एका ताकदवान मुस्लीम देशाने भारतास पाठींबा आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने एका प्रसिद्धीस दिलेल्या वक्तव्यात म्हटलेय की आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी टेलिफोनवर झालेल्या संभाषणात कतारचे अमीर शेख तमीम बिन अल-थानी यांनी भारतावर पहलगाममध्ये सीमेपलिकडून केलेल्या गोळीबारात ठार झालेल्या लोकांच्या प्रती सहवेदना व्यक्त केलीआहे. अतिरेक्यांविरोधात भारताची लढाई आणि गुन्हेगारांना न्यायालयाच्या कोठडीत आणण्यासाठी भारताच्या कारवाईसाठी पाठींबा दर्शविला आहे

# पुणे महापालिकेत भोंगाच नाही!

## अग्निशामक यंत्रणेतही सुधारणा आवश्यक, मॉक ड्रिलमध्ये त्रुटी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारत-पाकिस्तानदरम्यान तयार झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काय खबरदारी घ्यावी, यासाठी महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये मॉक ड्रिल घेण्यात आले. या मॉक ड्रिलमुळे महापालिकेच्या यंत्रणेतील अनेक त्रुटी समोर आल्या. महापालिकेच्या आवारात यंत्रणांना दक्ष करण्यासाठी भोंगा नसल्याचे समोर आले. इतकेच नव्हे, तर अग्निशामक यंत्रणादेखील योग्य पद्धतीने काम करत नसल्याचे स्पष्ट झाले.**



सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्ध झाल्यास नक्की काय करावे, नागरिकांची काळजी कशी घ्यावी, यासाठी केंद्र सरकारने राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या मुख्य भवनाच्या इमारतीमध्ये बुधवारी चार वाजण्याच्या सुमारास मॉक ड्रिल झाले. यामध्ये नागरी संरक्षण दल, अग्निशामक दल, वैद्यकीय अधिकारी, पोलिस विभाग, महापालिकेचा सुरक्षा विभाग, तसेच संकट व्यस्थापन विभागाने सहभाग घेतला.महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी मॉक ड्रिलबाबत सर्व उपस्थित कर्मचारी, अधिकारी, तसेच महापालिकेत कामानिमित्त आलेल्या नागरिकांना सविस्तर माहिती दिली.

संकटकालीन स्थिती निर्माण झाल्यास काय करावे, कशी काळजी घ्यावी, सर्व यंत्रणांना कसे सहकार्य करावे याबाबत मार्गदर्शन केले. मॉक ड्रिल झाल्यानंतर त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याचे समोर आले. महापालिकेत दररोज कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. तसेच, महापालिकेत विविध विभागांमध्ये शेकडो अधिकारी, कर्मचारी काम करतात. अचानक आग लागली, तर सर्वांना सूचना मिळावी, यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणारा भोंगाच महापालिकेकडे नाही.दुर्घटना घडल्यास योग्य समन्वय ठेवून नागरिकांना महापालिकेच्या बाहेर सुरक्षितपणे काढण्यासाठी पालिकेच्या सुरक्षा रक्षकांकडे संपर्क यंत्रणा (वॉकीटॉकी) नसल्याचे यानिमित्त समोर आले. सुरक्षारक्षकांना एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वॉकीटॉकी द्यावेत, अशी मागणी गेले तीन वर्षांपासून केली जात असून, त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले. अनेक कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात आल्याने अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील स्प्रिंकल बंद पडलेले आहेत. युद्धजन्य स्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेत मॉक ड्रिल घेण्यात आले. या वेळी काही यंत्रणा काम करीत नसल्याचे दिसून आले. भविष्यात मोठी दुर्घटना घडू नये,

### कार्यालयातील स्प्रिंकल बंद

सध्या भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्ध झाल्यास नक्की काय करावे, नागरिकांची काळजी कशी घ्यावी, यासाठी केंद्र सरकारने राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या मुख्य भवनाच्या इमारतीमध्ये बुधवारी चार वाजण्याच्या सुमारास मॉक ड्रिल झाले. यामध्ये नागरी संरक्षण दल, अग्निशामक दल, वैद्यकीय अधिकारी, पोलिस विभाग, महापालिकेचा सुरक्षा विभाग, तसेच संकट व्यस्थापन विभागाने सहभाग घेतला.सर्व उपस्थित कर्मचारी, अधिकारी, तसेच महापालिकेत कामानिमित्त आलेल्या नागरिकांना सविस्तर माहिती दिली.

# हल्ल्यानंतर पुणे पोलीस अधिक दक्ष!

## युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी प्रात्यक्षिके

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर भारतीय हवाई दलाने मध्यरात्री हल्ला केला. संभाव्य युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दक्ष झाले असून, बुधवारी पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागांत फेरी (रूटमार्च) काढली. राष्ट्रीय संकट निवारण पथकातील (एनडीआरएफ) जवानांसह पोलिसांनी संकटकालीन परिस्थितीला कसे सामोरे जायचे, याची प्रात्यक्षिके गर्दीच्या भागांत सादर केली.**



युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या सूचनेनुसार पुण्यातील विधान भवन, मुळशीतील पंचायत समिती, तसेच तळेगाव दाभाडे येथील नगरपरिषदेच्या कार्यालयात मॉक ड्रिल करण्यात आले. युद्धजन्य परिस्थितीला सामोरे कसे जायचे, याची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. मॉक ड्रिलमध्ये जिल्हा प्रशासन, महसूल, अग्निशमन दल, पोलीस, तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी बुधवारी शहराच्या वेगवेगळ्या भागांतून फेरी काढली. गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक, एसटी स्थानक, तसेच मॉल, कसे जायचे, याची प्रात्यक्षिके सादर केली. एनडीआरएफचे जवान प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी सहभागी झाले होते. संभाव्य अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर त्वरित पोलिसांशी संपर्क साधवा, तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुण्यातील संतोष जगदाळे, कौस्तुभ गणबोटे यांच्या निवासस्थानाच्या परिसरात पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे.तळेगाव दाभाडे येथील नगरपरिषदेच्या कार्यालयात मॉक ड्रिल करण्यात आले. युद्धजन्य परिस्थितीला सामोरे कसे जायचे, याची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. मॉक ड्रिलमध्ये जिल्हा प्रशासन, महसूल, अग्निशमन दल, पोलीस, तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी बुधवारी शहराच्या वेगवेगळ्या भागांतून फेरी काढली. गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक, एसटी स्थानक, तसेच मॉल, चित्रपटगृहांच्या परिसरात पोलिसांनी आपत्कलिन परिस्थितीला सामोरे कसे जायचे, याची प्रात्यक्षिके सादर केली. एनडीआरएफचे जवान प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी सहभागी झाले होते. अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर त्वरित पोलिसांशी संपर्क साधवा, तसेच अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन करण्यात आले.

### पोलिसांनी शहरातून फेरी काढली

संभाव्य युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दक्ष झाले असून, बुधवारी पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागांत फेरी (रूटमार्च) काढली. मॉक ड्रिलमध्ये जिल्हा प्रशासन, महसूल, अग्निशमन दल, पोलीस, तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. पुणे पोलिसांनी बुधवारी शहराच्या वेगवेगळ्या भागांतून फेरी काढली.

## पिंपरी महापालिका इमारतीमध्ये मॉकड्रिल यशस्वी

# धुराचे लोळ, पळापळ अन् प्रचंड भीती!

### युद्धजन्य परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांची तपासणीन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशाकीय इमारतीमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण... धुरांचे लोळ...आपत्ती व्यवस्थापन यंत्रणाचे फोन खणाणले... लगेच सायरनचा आवाज पसरला आणि एकच धावाधाव झाली. सुरक्षा यंत्रणेने तत्काळ चक्रे फिरवली...आणि अग्निशमन विभागाचे पथक पाच मिनिटांत पोहोचले...कर्मचारी, नागरिकांना सुरक्षितरित्या इमारतीबाहेर काढण्यात आले. १५ मिनिटात स्वसंरक्षण सराव (मॉकड्रिल) यशस्वी पार पडले.**



युद्धजन्य परिस्थितीमध्ये शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम ठेवणे, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्य इमारतीमध्ये बुधवारी मॉकड्रिल घेण्यात आले. चार वाजता सायरन वाजला. महापालिका इमारतीच्या चौथ्या मजल्यावर धूर पसरला असून काही लोक जखमी झाले आहेत. काहीजण अडकले असल्याची माहिती देण्यात आली. त्यानुसार पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीमधून सर्वांना बाहेर काढले. सर्वजण बाहेर आल्यानंतर जवानांनी प्रत्येक दालनात जाऊन कोणी अडकले नसल्याची खात्री केली. त्यानंतर इमारतीमधून चार नागरिकांना 'ब्रांटो स्काय लिफ्ट'च्या मदतीने रेस्क्यू करण्यात आले. दोघांना रोप लावून रेस्क्यू केले. तर, चौघांना स्ट्रेचरवरून रेस्क्यू करत रुग्णवाहिकेतून रुग्णालयाच्या दिशेने रवाना केले.

या मॉकड्रिलमध्ये अग्निशमन विभागाच्या चार बंबासह २० अधिकारी, कर्मचारी, चार रुग्णवाहिका, १६ कर्मचारी, सुरक्षा विभागाचे ५२ कर्मचारी , पोलीस अधिकारी, कर्मचारी असे ३७ जण तसेच वाहतूक पोलीसांचे २४ जण, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे एक अधिकारी, एनसीसी व राष्ट्रीय सेवा योजनेचे ४६ स्वयंसेवक, १८ आपदा मित्र सहभागी झाले होते.

> आपत्ती अचानक येते. त्यामुळे मॉकड्रिलच्या माध्यमातून यंत्रणांचे प्रशिक्षण आणि सज्जता वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात अशा अधिकाधिक मॉकड्रिल उपक्रमांचे आयोजन केले जाईल. १५ मिनिटांत मॉकड्रिल यशस्वीपणे पार पडले.
>
> **- तृप्ती सांडभोर,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

### 'स्मोक एग्जॉस्ट यंत्रणा'ही सज्ज

काही महिन्यांपूर्वी महापालिका इमारतीमध्ये मॉकड्रिल करण्यात आले होते. त्यावेळी इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. तो धूर लवकर बाहेर पडला नव्हता. अशाच प्रकारे रासायनिक हल्ला झाल्यास त्या धुरामध्ये अडकून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेत धूर तात्काळ बाहेर काढण्यासाठी 'स्मोक एग्जॉस्ट यंत्रणा' बसवण्यात आली आहे. ही यंत्रणा सक्रिय करून सर्व धूर काही क्षणात बाहेर काढण्यात आला.

---

## 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये जल्लोष!

### भाजपाने पेढे वाटून साजरा केला आनंदोत्सव : भारतीय जवानांच्या कामगिरीला सलाम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीतर्फे जल्लोष करण्यात आला. भाजपा मध्यवर्ती कार्यालय, मोरवाडी येथे कार्यकर्त्यांनी एकत्र येत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.**



पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय सैन्याने ७ मे रोजी पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. या कारवाईत लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन यांसारख्या दहशतवादी संघटनांच्या प्रशिक्षण केंद्रांसह नऊ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले. बहावलपूर, मुरीदके, सियालकोट, भिमबर, कोटली आणि मुझफ्फराबाद या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने एकत्रितपणे ही मोहीम यशस्वी केली. या यशस्वी कारवाईनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपा कार्यकर्त्यांनी शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मोरवाडी येथील कार्यालयात एकत्र येत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी आमदार उमाताई खापरे म्हणाल्या की, "भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून देशाचा गौरव वाढवला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाने प्रत्येक भारतीयाची छाती अभिमानाने फुलून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ही अतुलनीय कामगिरी केली आहे. भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर या यशाचा जल्लोष करून भारतीय सैनिकांचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करत आहे."

या कार्यक्रमात विधानपरिषद आमदार उमाताई खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, शैला मोळक, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माऊली थोरात, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, सिद्धेश्वर बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, माजी नगरसेविका साविताताई कुटे, सविताताई खुळे, आरती चोंधे, शर्मिला बाबर, अनुराधा गोरखे, वैशाली खाड्ये, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, मोहन राऊत, हर्षल नढे, रामदास कुटे, अमोल डोळस, सोमनाथ तापकीर, सनी बारणे, ऍड. योगेश सोनवणे, जयदीप खापरे, शिवराज लांडगे, अजित बुर्डे, निलेश अष्टेकर, बिभीषण चौधरी, शेखर चिंचवडे, कैलास सानप, मनोज ब्राह्मणकर, दत्तात्रेय ढगे, सचिन शिवले, भूषण जोशी, युवराज ढोरे, विनायक शिंदे, अमित गवळी, निलेश सरोदे, सचिन बंदी, देवदत्त लांडे, राहुल काटे, गणेश आर. ढाकणे, गणेश वाळुंजकर, विनोद तापकीर, गणेश लंगोटे, आदेश नवले, पल्लवी मारकड, रमेश काळे, कमलेश भरवाल, संजय पटनी, नंदू कदम, दत्ता चिंचवडे, शोभा भराडे, आशा काळे, निता कुशारे, राजश्री जायभाय, विजय शिनकर, संजय परळीकर यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### देहबुद्धीचा त्याग करावा.

मानाला कारण अभिमान होय. मी मोठा, असे मनाने घेतले म्हणजे मानाची गरज लागते. हा अभिमानच भगवंताच्या आणि आपल्यामध्ये आड येतो. हा अभिमान घालवायला, गुरुआज्ञेत राहणे, त्यांना शरण जाणे आणि त्यांनी सांगितलेली साधने करणे हे उपाय आहेत. पण ही साधने निरभिमानाने झाली पाहिजेत. हा अभिमान फार सूक्ष्म असतो. मी गुरुआज्ञेत राहतो, त्यांनी सांगितलेली साधने करतो, आता माझा अभिमान गेला, हे म्हणणेसुद्धा अभिमानाचेच बोलणे होय. खरे पाहता, अभिमान बाळगण्यासारखे आपल्याजवळ आहे तरी काय ? शक्ती, की पैसा, की कीर्ती ? जगात आपल्यापेक्षा कितीतरी लोक मोठे आहेत. पण मौज अशी की, भिक्षा मागणाऱ्यालासुद्धा मोठा अभिमान असतो. "मी अमक्याच्या इथे भिक्षेला गेलो होतो, त्याने मला हट् म्हटले तेव्हापासून त्याचा उंबरठा नाही चढलो मी" असे तो म्हणतो. तेव्हा हा अभिमान आणि अपमान ही काय चीज आहे याचा शोध आपण घ्यायला पाहिजे. याला अगदी मूळ कारण देहबुद्धी. ही देहबुद्धी नाहीशी झाली पाहिजे. एखाद्या झाडाला खत घालीत गेले तर ते मरेल कसे ? मला लोकांनी बरे म्हणावे, मान द्यावा, शिव्या दिल्या तर वाईट वाटते, हे देहबुद्धीला खत घालण्यासारखे आहे. चांगले-वाईट, मान-अपमान सर्व देवाला अर्पण करावे. वस्तुत: कर्तेपणच त्याच्याकडे सोपवावे. म्हणजे त्या कृत्याचे परिणाम मनावर होऊ देऊ नयेत. व्यवहारात थोडा अभिमान लागतोच, पण तो केवळ कारणापुरता असावा. वरिष्ठाने नोकरांशी वागताना अभिमान पाहिजे, पण तो तितक्याचपुरता; त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. ही देहबुद्धी, हा अभिमान, जायला सद्गुरूचे होऊन रहावे. निदान बळजबरीने तरी 'मी त्याचा आहे' असे म्हणावे. सद्गुरू तुम्हांला नकळत तुमचा अभिमान दूर करतील. परमार्थात संतांचेच ऐकण्यात महत्त्व आहे. तेथे आईबापांचे का ऐकू नये ? तर ज्याचे मन त्याच्या ताब्यात आहे, ज्याचे मन स्थिर झाले आहे किंवा ज्याचे मन नेहमी भगवंतापाशी आहे, अशाचेच ऐकण्यात विशेष आहे. आपल्या देहबुद्धीची तऱ्हा मोठी विलक्षण असते. सगुणोपासना आपल्या सवयीच्या आड येते म्हणून मनुष्य ती करीत नाही; फारच सोपे म्हणून तो भगवंताचे नाम घेत नाही; आणि फुकट काय जेवायला घालायचे, म्हणून तो अन्नदान करीत नाही. असा मनुष्य फुकटच जायचा ! देहबुद्धीला ताळ्यावर आणण्यासाठी संतांच्या ग्रंथांच्या वाचनाची गरज आहे. पहाट झाली की थोडा उजेड, थोडा अंधार असतो, त्याप्रमाणे सध्या आपली स्थिती आहे; देहबुद्धीच्या अंधारात भगवंताच्या स्मरणाचा किंचित् उजेड आहे. हा देहबुद्धीचा अंधकार जाऊन पूर्ण प्रकाश दिसायला, भगवंताच्या अनुसंधानासारखा दुसरा कोणता उपाय असणार ?

बोधवचन:- मीपणाची आणि अभिमानाची पूर्णाहुती देणे हाच खरा यज्ञ होय.

# 'ऑपरेशन सिंदूर' Controlled by नरेंद्र मोदीजी!





**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**भारताच्या कुरापती काढायच्या नसतात..भारताच्या नादी लागायचं नसतं, हे 'ऑपरेशन सिंदूर' वरून पाकव्यांना नक्की समजलं असणार! पण, नाक तुटलं तरी भोकं कायम, ही त्यांची मनोवृत्ती असल्यामुळं ते यापुढंही कुरापती काढणार, आणि भारताकडून सपाटून मार खाणार..थोबाड फोडून घेणार !**

### भारताची मोहीम फत्ते..

भारतीय सेनेनं अखेर पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरमधील अतिरेक्यांचे नऊ कॅम्प्स उद्ध्वस्त करून 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम फत्ते केली. भारतीय हवाई दलानं मंगळवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी 'एअर स्ट्राईक' करून पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला..भारतीय सेनेच्या या खास मोहिमेला 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव देण्यात आलं होतं.

### 'ऑपरेशन सिंदूर' च का?

पहलगाम मध्ये दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना वेचून वेचून मारले. महिलांना हातसुद्धा लावला नाही. तरुण युवकांना टिपल्यामुळं एक प्रकारची दहशत निर्माण झाली. पण, पुरुष मारले गेल्यामुळं अनेक नवविवाहित महिलांचं कुंकू पुसलं गेलं. त्या कुंकवाचा बदला म्हणून मोदी सरकारनं 'ऑपरेशन सिंदूर' हाती घेतलं आणि यशस्वीरीत्या पार पाडलं ! मुख्य गोष्ट अशी की स्वतः पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी या संपूर्ण ऑपरेशन वर आपली पकड मजबूत ठेवली होती.. संपूर्ण नियंत्रण त्यांचेच होते, म्हणा ना!

### दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त..

भारतीय वायुदलाकडून जैश- ए- महम्मद, हिजबुल मुज्राहिद्दीन आणि लश्कर-ए- तोयबाचे तळ उद्ध्वस्त.. मध्यरात्री दीड वाजता कारवाई.. दहशतवाद्यांचे ट्रेनिंग सेंटरही उद्ध्वस्त करण्यात आले, अशा बातम्या विविध समाज माध्यमांवरून रात्री झळकू लागल्या. उल्लेखनीय बाब म्हणजे या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणावर हल्ला केला नाही. भारतीय सेनेनं या मोहिमेत बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद या तीन शहरांमधल्या केवळ अतिरेक्यांच्या कॅम्पस चं अचूक लक्ष्य साधलं. 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये भारतीय सेनेनं बहावलपूरमध्ये जैश-ए- महम्मदचं धडकी भरवणारा प्रचंड मोठं हेडक्वार्टर उद्ध्वस्त केलं.

### मोदी हेच 'ऑपरेशन मॉनिटर!'

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला म्हणून, भारताच्या लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्तपणे पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताने आपल्या हद्दीत राहून हे हवाई हल्ले केल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. तथापि, काही हल्ले पाकिस्तानच्या सुमारे १०० किलोमीटर आत करण्यात आले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ऑपरेशन मॉनिटर करत होते. नऊ टार्गेट ठेवण्यात आले होते. नऊ च्या नऊ टार्गेट यशस्वी झाले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे, या मोहिमेत भारतीय सेनेनं पाकिस्तानी नागरिक किंवा पाकिस्तानी लष्कराच्या कोणत्याही ठिकाणांवर हल्ला केला नाही. भारतीय सेनेनं या मोहिमेत बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद या तीन शहरांमधल्या केवळ अतिरेक्यांच्या कॅम्पचं अचूक लक्ष्य साधलं, हे एक वैशिष्ट्य म्हणावं लागेल!

### डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेची अपेक्षा..

भारतानं जम्मू - काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून घेतला आहे. यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानमध्ये भारताचे एअरस्ट्राईक 'इट इज शेम' अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी दिली आहे. दोन्ही देशांनी तणाव कमी करावा, असा आग्रह वजा सूचना त्यांनी केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' बाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की मी याबाबत ऐकलेय, इट इज शेम, अपेक्षा आहे की हे लवकर समाप्त होईल. कोणत्याही दोन बलवान देशांना युद्धाच्या मार्गावर जाताना पाहू शकत नाही. या दोन्ही देशांचा इतिहास जुना असून तणाव वाढलेला आहे. मात्र, जगाला युद्ध नकोय शांतता पाहिजे, असं ट्रम्प म्हणाले. हे लवकर संपेल अशी आशा बाळगतोय, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

### अमेरिकेला क्षणोक्षणी माहिती..

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' वर अमेरिकेच्या विदेश विभागाचे प्रवक्ते म्हणाले, की आम्हाला याबाबत माहिती आहे. आम्ही सध्या अधिक भाष्य करणार नाही. सर्व घटनांवर नजर ठेवून आहोत. वॉशिंग्टनमध्ये भारतीय उच्चायुक्तालयाकडून जारी करण्यात आलेल्या वक्तव्यानुसार भारतानं एअरस्ट्राईक केल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी अमेरिकेच्या एनएसए आणि विदेश मंत्री मार्को रुबियो यांना फोनवरुन माहिती दिली आहे, असेही सांगण्यात आले.

### पाकिस्तान गारठलं..

पाकिस्तानी लष्कराच्या प्रवक्त्यांनी भारतानं मुजफ्फराबाद, कोटली, बहावलपूरमध्ये हल्ले केल्याच्या घटनेला पुष्टी दिली आहे. भारताचं कोणतंही विमान किंवा जेट पाकिस्तानच्या एअरस्पेसमध्ये आलं नव्हतं, असं त्यांनी म्हटलंय. पाकिस्तानमध्ये लाहोर आणि सियालकोट विमानतळं पुढील दोन दिवस बंद करण्यात आली आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. तर, १७ जण जखमी झाले होते. पहलगाम दहशतवादी हल्ला २२ एप्रिलला झाला होता. भारतानं या हल्ल्याचा बदला 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे घटनेच्या तेराव्या दिवशी घेतला आहे.

### दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले !

दरम्यान, पाकिस्तानी माध्यम संस्थांच्या म्हणण्यानुसार भारतीय सैन्यानं 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत बहावलपूरमध्ये जामा मशीद सुभान अल्लाहवर देखील एअर स्ट्राईक केला आहे. ही मशीद जैश-ए- महम्मदची हेडक्वार्टर आहे. पाकिस्तानच्या कोटलीमध्ये हिजबुल मुजाहिद्दीनचं प्रशिक्षण केंद्र आहे. मुजफ्फराबादमध्ये लष्कर-ए- तोयबाचं ट्रेनिंग सेंटर आहे. तर, हिजबुल मुजाहिद्दीनचं हेडक्वार्टर आहे. ही ठिकाणं हाफिज सईद आणि मसूद अजहरचे अड्डे आहेत, हे लक्षात घ्यायला हवे !

### शेकडो दहशतवादी ठार..

भारताच्या या कारवाईमध्ये नेमके किती दहशतवादी ठार झाले, याचा अंदाज येऊ शकलेला नाही. पण प्रत्येक ठिकाणी किमान ९० ते १०० दहशतवादी प्रशिक्षणासाठी मुक्कामाला होते, हे स्पष्ट दिसते. जैश-ए-महम्मद चा म्होरक्या मसूद अजहर याच्या कुटुंबातील १४ सदस्य या कारवाईत ठार झाले आहेत. त्यात त्याचा मुलगा, बहीण यांचाही समावेश आहे. कदाचित, तो यापुढे जास्त पिसाळून हिंसाचार घडवून आणू शकेल, पण त्याची कल्पना भारताच्या दिग्गजांच्याकडे नक्की असणार. पाहू या.. ही कारवाई म्हणजे फक्त शितावरून भाताची परीक्षा आहे.. खऱ्या कारवाया नंतरच होणार आहेत, हे पाकड्यांच्याही लक्षात आहे !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# हा नवीन भारत, हे पुन्हा एकदा दाखवून दिलं!

## मुख्यमंत्री फडणवीसांची 'ऑपरेशन सिंदूर'वर प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने मध्यरात्री 'एअर स्ट्राईक' करत दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. या 'एअर स्ट्राईक'मध्ये पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीतील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. भारताने केलेल्या या कारवाईत अनेक दहशतवादी मारले गेल्याची माहिती समोर आली आहे.**



तसेच मसूद अजहरच्या कुटुंबाचा देखील खात्मा करण्यात आला आहे. दरम्यान, भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर विविध क्षेत्रामधून प्रतिक्रिया समोर येत आहेत. आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील यावर भाष्य करत हा नवीन भारत, हे पुन्हा एकदा दाखवून दिलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने 'एअर स्ट्राईक' करत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीतील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. ज्या प्रकारे जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न पाकिस्तानच्या माध्यमातून होत होता. तसेच पहलगाममध्ये ज्या प्रकारे आमच्या बांधवांना मारण्यात आलं. त्यामधून संपूर्ण भारताच्या मनात संताप निर्माण झाला होता. मात्र, आज संपूर्ण भारतीयांना समाधान वाटलं. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानतो", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधीच सांगितलं होतं की पहलगामच्या घटनेचं प्रत्युत्तर दिलं जाईल. आम्ही अशा प्रकारची घटना सहन करणार नाही, असं मोदींनी स्पष्ट सांगितलं होतं. त्यानंतर अतिशय सबळ अशा प्रकारचं उत्तर भारतीय लष्कराने दिलं आहे. दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यात आले आहे. दहशतवादाच्या विरोधातील लढाई भारताने केली आहे. हा नवीन भारत आहे. हा नवा भारत अशा प्रकारचे हल्ले सहन करणार नाही. हे भारताने दाखवून दिलं", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.गेल्या १३ ते १४ दिवसांत जगातील अनेक देशांबरोबर संपर्क करून पहलगामच्या घटनेत पाकिस्तान कसा दोषी आहे? याचे पुरावे भारताने दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांनी विविध देशांबरोबर चर्चा करून पाकिस्तानने कशा प्रकारे हल्ला केला हे जगाला देखील सांगितलं आहे. त्यामुळेच आज संपूर्ण जग भारताबरोबर आहे. आपण जर पाहिलं तर पाकिस्तानच्या उत्तरेपासून ते दक्षिणेपर्यंत सगळीकडील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्याचं काम भारतीय लष्कराने केलं आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.तसेच मसूद अजहरच्या कुटुंबाचा देखील खात्मा करण्यात आला आहे. दरम्यान, भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर विविध क्षेत्रामधून प्रतिक्रिया समोर येत आहेत. आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील यावर भाष्य करत हा नवीन भारत, हे पुन्हा एकदा दाखवून दिलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.पहलगामच्या हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने 'एअर स्ट्राईक' करत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीतील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. ज्या प्रकारे जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न पाकिस्तानच्या माध्यमातून होत होता. तसेच पहलगाममध्ये ज्या प्रकारे आमच्या बांधवांना मारण्यात आलं. त्यामधून संपूर्ण भारताच्या मनात संताप निर्माण झाला होता. मात्र, आज संपूर्ण भारतीयांना समाधान वाटलं. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानतो", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### पाकिस्तान कसा दोषी आहे?

आम्ही अशा प्रकारची घटना सहन करणार नाही, असं मोदींनी स्पष्ट सांगितलं होतं. दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यात आले आहे. दहशतवादाच्या विरोधातील लढाई भारताने केली आहे. हा नवीन भारत आहे. हा नवा भारत अशा प्रकारचे हल्ले सहन करणार नाही. हे भारताने दाखवून दिलं", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. गेल्या १३ ते १४ दिवसांत जगातील अनेक देशांबरोबर संपर्क करून पहलगामच्या घटनेत पाकिस्तान कसा दोषी आहे? याचे पुरावे भारताने दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, राजनाथ सिंह यांनी विविध देशांबरोबर चर्चा करून पाकिस्तानने कशा प्रकारे हल्ला केला हे जगाला देखील सांगितलं आहे.

# दहशतवादी स्थळांवर केलेला हल्ला अभिमानास्पद

## भारतीय सेनेच्या शौर्याला शिवसेनेचा सलाम : उद्धव ठाकरे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाम या ठिकाणी २२ एप्रिल या दिवशी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात २६ निरपराध भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद जगात उमटले. तसंच या हल्ल्याच्या मागे पाकिस्तान आहे ही बाबही समोर आली. दरम्यान पाकिस्तानला भारताकडून कसं उत्तर दिलं जाणार? काय कारवाई केली जाणार याच्या विविध चर्चा होत असतानाच ६ मेच्या रात्री उशिरा पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरमधल्या दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करण्यात आला.**



भारतीय सैन्याने पाकड्यांच्या दहशतवादी स्थळांवर केलेला हल्ला अभिमानास्पद आहे. पहलगाममध्ये २६ मायभगिनींचं कुंकू पुसणाऱ्या दहशतवाद्यांचा खात्मा करुन सैन्याने बदला घेतला. पाकिस्तानचे भारतातील स्लीपर सेल्स उद्ध्वस्त करुन दहशतवादाचे समूळ उच्चाटन करणं गरजेचं आहे. भारतीय सैन्य सर्व प्रकारच्या परिस्थितीशी सामना करण्यास सक्षम आहे. ऑपरेशन सिंदूरने ते दाखवून दिलं. भारतीय सेनेच्या शौर्याला शिवसेनेचा सलाम" असं म्हणत उद्धव ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरमधील दहशतवादी तळांवर भारतीय हवाई दलाने हल्ला करत दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य केलं. यातील एका तळावर वास्तव्यास असलेल्या मसूद अझहरच्या कुटुंबातील १० तर निकटवर्तीय असलेल्या ४ सदस्यांचा मृत्यू झाला. या हल्यात मसूद अझहरचा भाऊ रौफ असगर हा गंभीर जखमी झाला आहे. तर ठार झालेल्यांमध्ये मसूद अझहरचा भाऊ आणि भारताचा मोस्ट वॉन्टेड दहशतवादी रौफ असगरचा मुलगा हुजैफा यांचा देखील समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे.

### मिसारी यांनी काय सांगितलं?

पहलगामचा हल्ला हा अत्यंत क्रूर होता. तिथे दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना गोळ्या झाडून ठार केलं. खरंतर जम्मू काश्मीरची स्थिती चांगली होत होती. ती बिघडवण्यासाठी पहलगामचा हल्ला झाला. मागच्या वर्षी सव्वा दोन कोटींहून अधिक लोकांनी काश्मीरला भेट दिली होती. त्यानंतर पाकिस्तानने कुरापती काढण्यास सुरुवात केली. जम्मू काश्मीरमध्ये धार्मिक दंगे उसळवण्यासाठीही दहशतवादी हल्ला केला. TRF ने या हल्ल्याची जबाबदारी घेतली. ही संघटना पाकिस्तानशी संबंधित आहे. प्रत्यक्षदर्शी आणि तपास यंत्रणांच्या मदतीने हल्लेखोरांची ओळखही पटली आहे. पहलगामचा जो हल्ला झाला तो दहशत पसरवण्यासाठीच झाला. पाकिस्तान हा दहशतवादी देश आहे हे आता जगाला कळलं आहे. या हल्ल्याला उत्तर देणं आवश्यक होतं म्हणून आम्ही एअर स्ट्राईक केला असं विक्रम मिसारी यांनी स्पष्ट केलं.

# दहशतवाद्यांचे बालेकिल्ले उदध्वस्त!

## ‘पीओके’मधील पाच तळांवर क्षेपणास्त्रांचा भडीमार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगामसह गेल्या दशकभरात भारतात झालेल्या दहशतवादी कारवायांना चोख प्रत्युत्तर देत बुधवारी मध्यरात्रीनंतर राबविण्यात आलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये ‘लष्कर-ए-तय्यबा’सह ‘जैश-ए-मोहम्मद’ आणि ‘हिजबुल मुजाहिद्दीन’ या दहशतवादी संघटनांचे नऊ तळ अवघ्या २५ मिनिटांत उद्ध्वस्त केले. आंतरराष्ट्रीय सीमेवरून भारताने प्रथमच कारवाई करत पाकिस्तानी पंजाबमधील चार तळांना लक्ष्य केले. तसेच पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे पाच तळ भुईसपाट करण्यात आले.**




‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू केल्यानंतर सुमारे साडेनऊ तासांनी याची माहिती केंद्र सरकारने पत्रकार परिषदेत दिली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. लष्कर व हवाई दलाने नऊ ठिकाणी क्षेपणास्त्र हल्ले केल्याचे यावेळी स्पष्ट झाले. दोन सर्वांत मोठे हल्ले थेट प्रत्यक्ष पाकिस्तानात करण्यात आले. लाहोरपासून काही अंतरावर असलेले मुरिदके तर आंतरराष्ट्रीय समीपासून सुमारे १०० किमी आत असलेल्या बहावलपूरलाही लक्ष्य करण्यात आले. बहावलपूर जैश-ए-मोहम्मदचा बालेकिल्ला असून मुरिदकेमध्ये लष्कर-ए-तय्यबाचे मुख्यालय आहे. ही ठिकाणे दहशतवादी निर्माण करणारे कारखाने मानले जाते होते. या दोन्ही ठिकाणी डागलेल्या क्षेपणास्त्रांत प्रत्येकी २५-३० दहशतवादी ठार झाल्याचा अंदाज आहे. दहशतवादी संघटनांची लष्करी प्रशिक्षण केंद्रे, वैचारिक प्रशिक्षण केंद्रे या हल्ल्यामध्ये उद्ध्वस्त करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या दहशतवादी अड्डयांना पाकिस्तानी लष्कर, गुप्तहेर संघटना आयएसआय आणि स्पेशल सर्व्हिसेस ग्रुपकडून दहशतवाद्यांच्या प्रशिक्षणासाठी सर्वप्रकारची रसद पुरवली जात असल्याचा सबळ पुरावा भारताकडे होता व त्याआधारेच ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवण्यात आल्याचे सांगण्यात आले.कर्नल कुरेशी आणि विंग कमांडर सिंह यांनी या कारवाईबाबत माहिती देताना सांगितले, की २००१ मध्ये संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यापासून पहलगाम हल्ल्यापर्यंत पाकिस्तानच्या सहभागाचे स्पष्ट पुरावे भारताकडे आहेत. पत्रकार परिषदेत याबाबत चित्रफीत दाखवण्यात आली व नंतर ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये कोण-कोणत्या ठिकाणांवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला गेला याचीही दोन मिनिटांची चित्रफीत प्रसारित करण्यात आली. ‘गेल्या तीन दशकांपासून, पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांची भरती केंद्रे चालवली जाताता, दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते, दहशतवाद्यांना विविध सुविधा पुरवल्या जातात, हे अड्डे नष्ट करण्यासाठी आणि भविष्यातील असे हल्ले रोखण्यासाठी ही कारवाई केली गेली, असे करण्यात आली होती,’ असे कर्नल कुरेशी म्हणाल्या. मोहीम फत्ते झाल्यानंतर भारतीय लष्कराने ‘एक्स’वरून ‘न्याय मिळाला’ असा संदेश देणारी चित्रफीत प्रसिद्ध केली. २२ एप्रिल रोजी पहलगाममधील हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांनी ज्या महिलांच्या पतींची हत्या केली त्या महिलांना ‘ऑपरेशन सिंदूर’ समर्पित असल्याचे सरकारने स्पष्ट केले.क्षेपणास्त्र हल्ला केलेल्या प्रत्येक दहशतवादी अड्डयावर गुप्तचर यंत्रणांनी बराच काळ नजर ठेवली होती व या अड्डयांवर दहशतवाद्यांना आश्रय दिला जात असल्याचे पुरावेही या यंत्रणांनी गोळा केले होते.

### सबळ पुराव्यांआधारे कारवाई

मानवी संपर्क, दहशतवाद्यांच्या मुख्यालयात होणारी माहितीच्या देवाण-घेवाणीचे तपशील दशतवाद्यांच्या नेत्यांचे संभाषण इंटरसेप्ट करून माहिती गोळा करण्यात आली होती. त्या आधारे ‘ऑपरेशन सिंदूर’ची आखणी केली गेल्याचे सूत्रांनी सांगितले.‘गेल्या तीन दशकांपासून, पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांची भरती केंद्रे चालवली जाताता, दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते, दहशतवाद्यांना विविध सुविधा पुरवल्या जातात, हे अड्डे नष्ट करण्यासाठी आणि भविष्यातील असे हल्ले रोखण्यासाठी ही कारवाई केली गेली, असे करण्यात आली होती,’ असे कर्नल कुरेशी म्हणाल्या.

# सोफियाने जे देशासाठी केलं त्याचा अभिमान!

## सोफिया कुरेशी यांची आई हलिमा आणि कुटुंबाने प्रतिक्रिया दिली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पहलगाम इथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ६ मेच्या रात्री पाकिस्तानच्या पीओजेकेवरील ९ दहशतवादी दहशतवादी तळांवर एअर स्ट्राइक करून ते उद्ध्वस्त करण्यात आले. साधारण २५ मिनिटांत भारतीय लष्कराने ही कारवाई केली असल्याची माहिती लष्कराच्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.**





या कारवाईला ऑपरेशन सिंदूर असं नाव देण्यात आलं आणि त्याचं कारणही तसंच होतं. पहलगाममधील या हल्ल्यात पुरूषांना लक्ष्य करत दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या. त्यांच्यासोबत असलेल्या अनेक महिलांचे कुंकू पुसले गेले. या महिलांचा आक्रोश संपूर्ण जगाने पाहिला होता. याच कारणाने या कारवाईला ‘ऑपरेशन सिंदूर’ असे नाव देण्यात आले. विशेष म्हणजे, भारतीय लष्कराने आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दोन महिला अधिकाऱ्यांनी या ऑपरेशनबाबत माहिती दिली.

एक होत्या सोफिया कुरेशी आणि दुसऱ्या होत्या विंग कमांडर व्योमिका सिंग. सोफिया यांच्या आईने, वडिलांनी आणि भावाने आनंद व्यक्त केला आहे.माझ्या मुलीने आपल्या देशासाठी, हिंदुस्थानासाठी जे केलं आहे त्याचा मला खूप आनंद आहे. याचप्रकारे तिने पुढे जावं, तसंच इतरांनी आपल्या मुलींना शिकवावं, समृद्ध करावं. त्यांना चांगलं शिक्षण द्या जेणेकरुन त्या माझ्या मुलीप्रमाणे सैन्य दलात अधिकारी होतील आणि देशासाठी काहीतरी करु शकतील. प्रत्येक घरातली एक मुलगी आणि एक मुलगा सैन्यात गेला पाहिजे असं मला वाटतं. सोफिया जेव्हा लहान होती तेव्हा तिची आजी तिला गोष्टी सांगायची. तुझे आजोबा लष्करात आहेत त्यांचे किस्से आजी सोफियाला सांगत असे. सोफिया आणि तिची बहीण खेळण्यातली बंदुकही खेळायची. ती मोठी झाली, तिचं शिक्षण झाल्यावर तिने सांगितलं .

### आई हलिमा यांनी काय सांगितलं?

एअर स्ट्राईकच्या आधी सोफिया फक्त इतकंच म्हणाली होती आमच्यासाठी दुवा कर. काय होणार आहे ते आम्हालाही माहीत नव्हतं. दोन दिवसांपूर्वी ती इतकंच म्हणाली होती की आमच्यासाठी दुवा कर बस इतकंच बोलणं झालं. पुढे काय होणार? ते आम्हालाही माहीत नव्हतं. असं सोफिया कुरेशी यांची आई हलिमा कुरेशी यांनी सांगितलं.सोफिया कुरेशींचा भाऊ म्हणाला, आज मी टीव्ही बघत होतो आणि मला आश्चर्याचा धक्का बसला मी म्हटलं अरे ही तर माझी बहीण सोफिया आहे. तिने पाकिस्तानला कसा धडा शिकवला ते ऐकलं तेव्हा वाटलं की आता हिशोब बरोबर झाला आणि गर्वाने आमचीही छाती फुलून आली. देशासाठी प्राण पणाला लावण्याचाक्षण हा कुठल्याही सैनिकासाठी मोलाचाच असतो.

# गर्लफ्रेंडसाठी बँकेत नोकरी ते इंडस्ट्रीत एन्ट्री

बॉलीवूडसह मराठी सिनेविश्वात आपल्या अभिनय आणि दिग्दर्शनाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक म्हणजे महेश मांजरेकर. आजवर त्यांनी अनेक लोकप्रिय चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीला अनेक दर्जेदार चित्रपटांची पर्वणी घडवून आणणाऱ्या महेश मांजरेकरांनी एकेकाळी गर्लफ्रेंडच्या सांगण्यावरुन बँकेत नोकरी केली होती. पण इथेही त्यांचं मन रमलं नाही. त्यामुळे त्यांनी या नोकरीचा राजीनामा दिला आणि पुन्हा आपल्या आवडीच्या क्षेत्रात एन्ट्री घेतली. महेश मांजरेकरांनी नुकताच लोकमत फिल्मीशी संवाद साधला. या संवादात त्यांनी त्यांच्या गर्लफ्रेंड, नोकरी आणि त्यांच्या या क्षेत्रातील एन्ट्रीबद्दल सांगितलं. याबद्दल महेश मांजरेकर असं म्हणाले की, "माझी एक गर्लफ्रेंड होती. तिचं म्हणणं होतं की, नोकरी करायची. कारण



व्यवसाय अनिश्चित असतो. मग हे सगळं करत असताना बँकेची प्रवेश परीक्षा दिली. त्यानंतर निकाल येईपर्यंतच्या वेळेत मी नगरला जाऊन हापसे (बोअरवेल) खणले. ते दिवस चांगले होते. तेव्हा खूप मज्जा केली."यापुढे ते म्हणाले, "तेव्हा मी त्या कंपनीचा मॅनेजर होतो. माझ्या मित्राच्या काकाचीच ती कंपनी होती. घरापासून बाहेर राहणं काय असतं हे मी त्या काळात अनुभवलं. कुठेही राहण्याची तयारी असणं आणि जे मिळेल ते खाणं ही सवय मला तिकडे लागली. तेव्हा गर्लफ्रेंडच्या घरचे पण नोकरी बघ, नोकरी बघ असं सांगत होते. मग बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये मला नोकरी लागली. बोअरवेलमध्ये जिथे कामाला होतो; तिथे तो सांगत होता की, तुला बँकेत मिळतात त्यापेक्षा तिप्पट पैसे देतो. पण गर्लफ्रेंडला नोकरीत अधिक सुरक्षितता वाटत होती. त्यामुळे मग शेवटी बँकेत नोकरी केली."यापुढे महेश मांजरेकरांनी सांगितलं की, "बँकेत काही केल्या मन लागत नव्हतं. तिकडे माझी खूप चिडचिड व्हायची. मी कायम अस्वस्थ होतो. जिथे रस्ता मिळेल तिथे गेलो आहे. त्यामुळेच आजवर इथे पोहोचलो आहे.

## स्टॅंकोविकचा एक्स बॉयफ्रेंड प्रसिद्ध अभिनेत्रीला करतोय डेट

अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन जवळपास ५ वर्षांपासून एकत्र आहेत. या दोघांची पहिली भेट २०१८ मध्ये रोहित शेट्टीच्या रिॲलिटी 'शो खतरों के खिलाडी'मध्ये झाली होती. या शोच्या शूटिंगसाठी अर्जेंटिनामध्ये एकत्र घालवल्यामुळे ते दोघेही एकत्र आले आणि दोघेही चांगले मित्र झाले. जास्मिनला अली आवडत होता. २०२० मध्ये, अली बिग बॉसच्या घरात वाइल्डकार्ड एन्ट्री म्हणून आला, तिथे त्याने जास्मिनबद्दल असलेल्या भावना कबूल केल्या. तेव्हापासून ते रिलेशनशिपमध्ये आहेत. जास्मिन शीख कुटुंबातून येते, तर अली मुस्लीम आहे. दोघांच्या आंतरधर्मीय नात्याबद्दल जास्मीनच्या कुटुंबाची प्रतिक्रिया काय होती, ते तिने सांगितलं. आता एका मुलाखतीत जास्मिनने तिच्या शीख पालकांनी एका मुस्लीम मुलाबरोबरच्या तिच्या नात्याबद्दल कशी प्रतिक्रिया दिली होती हे सांगितलं. "माझ्या आईवडिलांना अलीबरोबरचं माझं नातं अचानक समजलं.



## सुझानचा स्वभाव कसा आहे?

अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन ५ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांनी आपलं नातं लपवून ठेवलं नाही. दोघेही एकत्र इव्हेंट्सला जातात, फिरायला जातात आणि फोटो व व्हिडीओही शेअर करतात. इतकंच नव्हे तर दोघेही एकमेकांबरोबर सण व उत्सव साजरे करतात. अनेकदा त्यांचे कुटुंबीयही त्यांच्याबरोबर असतात. अली गोनी हा हार्दिक पंड्याची पूर्वाश्रमीची बायको नताशाचा एक्स बॉयफ्रेंड आहे. अलीचा चुलत भाऊ अर्सलान गोनी हृतिक रोशनच्या पहिल्या बायकोबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. अली व अर्सलानचे कुटुंबीय मूळचे जम्मूचे आहेत. बरेचदा ते कुटुंबाबरोबर सण व खास प्रसंग साजरे करतात. तेव्हा अली व अर्सलान यांच्याबरोबर सुझान व जास्मिन यांचीही भेट होते. अलीची गर्लफ्रेंड जास्मिनला सुझानबद्दल एका मुलाखतीत विचारण्यात आलं. तेव्हा सुझानच्या स्वभावाबद्दल जास्मिन काय म्हणाली, ते जाणून घेऊयात.सुझानने हृतिक रोशनची एक्स पत्नी सुझान खान हिला कुटुंब म्हटलं आहे. अली गोनी हा सुझानचा बॉयफ्रेंड अर्सलान गोनीचा चुलत भाऊ आहे. सुझान खान व अर्सलान गोनी रिलेशनशिपमध्ये आहेत. अली व अर्सलानच्या कुटुंबाचे संबंध चांगले आहेत. त्यामुळे अनेकदा ते एकमेकांना भेटत असतात. या दोन्ही भावांमुळे जास्मिन व सुझानही एकमेकींना भेटतात आणि त्यांचा चांगला बाँड निर्माण झाला आहे. सुझानबद्दल बोलताना जास्मिन म्हणाली, "सुझानबरोबर माझं नातं खूप सुंदर आहे. कारण ती मला भेटलेली सर्वात नम्र, प्रेमळ आणि सर्वात सकारात्मक महिला आहे. माझे खूप मित्र आहेत आणि ते सर्व चांगले आहेत; पण सुझान ही खूप वेगळी खास आहे. तुम्ही तिच्याकडे एखाद्याबद्दल तक्रार केली तरी तिचे उत्तर सकारात्मक असते."सुझानबद्दल बोलताना जास्मिन म्हणाली, "सुझानबरोबर माझं नातं खूप सुंदर आहे. कारण ती मला भेटलेली सर्वात नम्र, प्रेमळ आणि सर्वात सकारात्मक महिला आहे. माझे खूप मित्र आहेत आणि ते सर्व चांगले आहेत; पण सुझान ही खूप वेगळी खास आहे. तुम्ही तिच्याकडे एखाद्याबद्दल तक्रार केली तरी तिचे उत्तर सकारात्मक असते."अभिनेता अली गोनी व अभिनेत्री जास्मिन भसीन ५ वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. त्यांनी आपलं नातं लपवून ठेवलं नाही. दोघेही एकत्र इव्हेंट्सला जातात, फिरायला जातात आणि फोटो व

## आमिरने आठवडाभर केली नव्हती अंघोळ

बॉलीवूड अभिनेता आमिर खान हा कायमच वैविध्यपूर्ण कथानकं असलेले चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येतो. आमिर खानचे बरेचसे चित्रपट हे प्रबोधन घडवणारे असतात, तर प्रत्येक चित्रपटात त्याने वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत आणि यातील प्रत्येक भूमिकेसाठी त्याने पुरेपूर मेहनत घेतली आहे. 'दंगल'मधील महावीर सिंग फोगाट या भूमिकेसाठी अभिनेत्याने तब्बल २८ किलो वजन वाढवलं होतं, तर 'गजनी' चित्रपटातील शर्टलेस सीनसाठी फिटनेसकडे लक्ष देऊन सिक्स पॅक ॲप बनवले होते. आमिर खान कायमच त्याच्या प्रत्येक चित्रपटासाठी मेहनत घेताना दिसतो आणि म्हणूनच त्याच्या प्रत्येक चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतो. अशातच नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आमिर खानने त्याच्याबद्दलचा एक किस्सा सांगितला आहे. 'एबीपी लाईव्ह सुमित' ला दिलेल्या मुलाखतीत त्याने 'राख' चित्रपटातील एक किस्सा सांगत म्हटलं, "'राख' चित्रपटात असे काही सीन आहेत, जिथे मी साकारत असलेल्या पात्राने घर सोडलेलं असतं आणि तो रस्त्यावर राहात असतो."त्यामुळे त्या भूमिकेत शिरण्यासाठी आणि लोकांना मी खरंच बेघर आहे असं वाटावं म्हणून मी खऱ्या आयुष्यात काही दिवस अंघोळ केली नव्हती. जोवर चित्रपटातील त्या ट्रॅकचं चित्रीकरण सुरु होतं तोवर मी अंघोळ केली नव्हती." पुढे आमिरने या मुलाखतीत त्याला 'द परफेक्शनिस्ट' असं संबोधलं जातं याबाबत सांगितलं आहे. तो म्हणाला, "लोक मला 'द परफेक्शनिस्ट' म्हणतात, पण मी स्वत:ला 'परफेक्शनिस्ट' समजत नाही.



## प्रियांका का रडलेला लोकप्रिय गायक?

हिंदी व पंजाबी संगीत क्षेत्रात मिका सिंगला नावाजलेला गायक म्हणून ओळखले जाते. आतापर्यंतच्या त्याच्या करिअरमध्ये त्याने गायलेली अनेक गाणी गाजली आहेत. मिका सिंग अनेक रिॲलिटी शोमध्ये परीक्षक म्हणून दिसतो. आता एका मुलाखतीत मिका सिंग एका रिॲलिटी शोमधील किस्सा सांगितला आहे. त्यामध्ये प्रियकां चोप्रा हजर होती. मिका सिंगने नुकतीच शुभांकर मिश्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत मिका सिंगने तो एका रिॲलिटी शोमध्ये का रडला होता आणि त्यानंतर त्याला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले होते, असा खुलासा आहे.मिका सिंग म्हणाला, "कधीकधी मी माझी गाणी ऐकूण रडायचो. मला वाटतं की ते वयच तसं होतं. एका रिॲलिटी शोमध्ये मी दोन ओळी गायल्यानंतर रडलो. आता मी हे कोणाला सांगितलं तर माझ्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. ते म्हणतील की तू काही तानसेनचा मुलगा नाहीस"पुढे मिका सिंग म्हणाला, "त्या रिॲलिटी शोमध्ये मी 'बडे अच्छे लगते है' हे गाणे गात होतो. मला माझंच गाणं ऐकूण आनंद झाला. प्रियांका चोप्रा माझ्याशेजारी बसली होती आणि मी रडायला सुरुवात केली. त्यानंतर मला ट्रोल केले गेले. असे म्हटले गेले की त्याला गाता येत नाही म्हणून तो रडत आहे. सगळी इंडस्ट्री रिॲलिटी शोमध्ये येऊन रडते. तीच गोष्ट मी केली तर लोकांनी मला विचारले की तू हे का करत आहेस?", असे म्हणत मिका सिंगने किस्सा सांगितला.

# कसोटी कर्णधार कोण होणार?

## गिल कसोटी संघाच्या कर्णधारपदाच्या शर्यतीत आघाडीवर

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय संघाचे नेतृत्त्व केलेल्या यशस्वी कर्णधारांपैकी एक राहिलेल्या रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. रोहितने ७ मे रोजी इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. यानंतर भारताचा पुढचा कसोटी कर्णधार कोण असेल? हा प्रश्न सर्वानाच पडला आहे.**




द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील भारताच्या निवड समितीला नवीन कसोटी चक्राचा विचार करताना दीर्घकालीन कर्णधार हवा आहे. फक्त इंग्लंड दौऱ्याचा विचार न करता दीर्घकाळासाठी कर्णधार निवडण्याच्या तयारीत निवड समिती आहे. पण यामध्ये ऋषभ पंत किंवा जसप्रीत बुमराह नाही तर युवा खेळाडू पुढे आहे.रोहित शर्माच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर, शुबमन गिल भारताच्या कसोटी संघाच्या कर्णधारपदाच्या शर्यतीत आघाडीवर आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील वरिष्ठ निवड समितीचा युवा खेळाडूला तयार करण्याची गरज आहे.निवड समितीच्या मते हा युवा खेळाडू म्हणजे शुबमन गिल आहे. २५ वर्षीय गिल हा कसोटी कर्णधार होण्यासाठी आदर्श उमेदवार आहे, असे त्यांचे मत आहे.

औपचारिक घोषणा करण्यापूर्वी निवड समिती बीसीसीआयशी यावर चर्चा करेल.

जर गिलला कसोटी कर्णधार म्हणून नियुक्त केले गेले तर त्याची पहिली कामगिरी इंग्लंडमधील पाच सामन्यांची कसोटी मालिका असेल.इंडियन एक्सप्रेसने यापूर्वी वृत्त दिले होते की भारताचा वेगवान गोलंदाज आणि उपकर्णधार जसप्रीत बुमराह जूनच्या अखेरीस सुरू होणाऱ्या इंग्लंडच्या कसोटी दौऱ्यात कर्णधारपद भूषवण्याची शक्यता कमी आहे. या स्टार वेगवान गोलंदाजाने वर्षअखेरीस ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारताला एकमेव कसोटी सामन्यात विजय मिळवून दिला होता. याशिवाय, त्याने इतर दोन कसोटी सामन्यांमध्येही नेतृत्व केले.

परंतु बुमराह त्याच्या वर्कलोड मॅनेजमेंटमुळे इंग्लंडमध्ये पाचही कसोटी सामने खेळण्याची शक्यता कमी असल्याने निवडकर्त्यांना दुसरा पर्याय विचारात घ्यावा लागला. निवडकर्त्यांना भावी कर्णधार म्हणून युवा खेळाडूला तयार करायचं आहे. अशा परिस्थितीत, नवीन कसोटी चक्रासह, निवड समिती भारतीय संघाकरता दीर्घकालीन कर्णधाराचा पर्याय शोधत आहे, त्यांच्यामते गिल या श्रेणीत बसतो. बुमराहनंतर पंतचं नाव पुढे होतं, पण त्याचा फॉर्म पाहता निवड समितीने दुसरा पर्याय निवडण्याचा विचार केला. भारताची इंग्लंडविरुद्धची कसोटी मालिका २० जूनपासून सुरू होणार आहे, तर पाचवी आणि शेवटची कसोटी ३१ जुलैपासून सुरू होणार आहे.द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील भारताच्या निवड समितीला नवीन कसोटी चक्राचा विचार करताना दीर्घकालीन कर्णधार हवा आहे. फक्त इंग्लंड दौऱ्याचा विचार न करता दीर्घकाळासाठी कर्णधार निवडण्याच्या तयारीत निवड समिती आहे. पण यामध्ये ऋषभ पंत किंवा जसप्रीत बुमराह नाही तर युवा खेळाडू पुढे आहे

### युवा खेळाडूला तयार करण्याची गरज

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील वरिष्ठ निवड समितीचा युवा खेळाडूला तयार करण्याची गरज आहे.निवड समितीच्या मते हा युवा खेळाडू म्हणजे शुबमन गिल आहे. २५ वर्षीय गिल हा कसोटी कर्णधार होण्यासाठी आदर्श उमेदवार आहे, असे त्यांचे मत आहे. औपचारिक घोषणा करण्यापूर्वी निवड समिती बीसीसीआयशी यावर चर्चा करेल. जर गिलला कसोटी कर्णधार म्हणून नियुक्त केले गेले तर त्याची पहिली कामगिरी इंग्लंडमधील पाच सामन्यांची कसोटी मालिका असेल.इंडियन एक्सप्रेसने यापूर्वी वृत्त दिले होते की भारताचा वेगवान गोलंदाज आणि उपकर्णधार जसप्रीत बुमराह जूनच्या अखेरीस सुरू होणाऱ्या इंग्लंडच्या कसोटी दौऱ्यात कर्णधारपद भूषवण्याची शक्यता कमी आहे. या स्टार वेगवान गोलंदाजाने वर्षअखेरीस ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारताला एकमेव कसोटी सामन्यात विजय मिळवून दिला होता.

# चेन्नई सुपर किंग्सचा तिसरा विजय!

## विजयासह केकेआरचा प्लेऑफच्या आशांना लावला धक्का

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**धोनीचा षटकार अन् अंशुल कंबोजचा चौकारासह चेन्नईने यंदाच्या मोसमातील तिसरा विजय मिळवला. आयपीएल २०२५ मधून बाहेर झालेल्या चेन्नई सुपर किंग्स संघाने केकेआरचा २ विकेट्सने पराभव करत कोलकाताला जवळपास स्पर्धेतून बाहेर केलं आहे. चेन्नईचा पराभवाचा सिलसिला थांबवत अखेरीस विजय नोंदवला आहे. चेन्नईच्या या विजयाचे हिरो नूर अहमद आणि डेवाल्ड ब्रेविस ठरले.**



केकेआरने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरूवात खूपच खराब झाली. चेन्नईचे दोन्ही सलामीवीर आयुष म्हात्रे आणि डेव्हॉन कॉन्वे डकवर बाद झाले. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या उर्विल पटेलने वादळी सुरूवात केली. उर्विल पटेल ११ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३१ धावांची झटपट खेळी करत बाद झाला. याशिवाय डेवाल्ड ब्रेविसने पहिलं अर्धशतक झळकावत शानदार खेळी केली.

ब्रेविसने वैभव अरोराच्या एका षटकात चौकार-षटकारांचा पाऊस पाडत ३० धावा कुटल्या. यासह ब्रेविसने २५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५२ धावांची खेळी केली.ब्रेविसनंतर धोनी आणि शिवम दुबेने ४३ धावांची सावध भागीदारी करत संघाला विजय मिळवून देण्यात भूमिका बजावली. शिवम दुबेचे अर्धशतक हुकले असले तरी त्याने ४० चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ४५ धावा केल्या. तर धोनीने एका षटकारासह १७ धावांची खेळी केली. तर अंशुल कंबोजने एक चौकारासह संघाला दोन चेंडू शिल्लक ठेवत विजय मिळवून दिला. केकेआरकडून वैभव अरोराने सर्वाधिक ३ विकेट्स घेतले पण त्याची सर्वाधिक धुलाई चेन्नईच्या फलंदाजांनी केली. याशिवाय हर्षित राणा आणि चक्रवर्तीने २-२ विकेट तर मोईन अलीने १ विकेट घेतली. प्रथम फलंदाजीला उतरलेल्या केकेआरची सुरूवातही खराब झाली. दुसऱ्या षटकात पहिली विकेट गमावल्यानंतर, सुनील नरेन आणि कर्णधार अजिंक्य रहाणे यांनी एक मजबूत भागीदारी रचली आणि संघाचा डाव सावरला. संघाने झटपट १०३ धावांपर्यंत आणखी ३ विकेट गमावल्या. दरम्यान आंद्रे रसेल आला आणि त्याने काही मोठे फटके खेळून संघाला १७९ धावांच्या सामन्याच्या योग्य धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

### शिवम दुबेचे अर्धशतक हुकले

दुसऱ्या षटकात पहिली विकेट गमावल्यानंतर, सुनील नरेन आणि कर्णधार अजिंक्य रहाणे यांनी एक मजबूत भागीदारी रचली आणि संघाचा डाव सावरला. दरम्यान आंद्रे रसेल आला आणि त्याने काही मोठे फटके खेळून संघाला १७९ धावांच्या सामन्याच्या योग्य धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। गुरुवार ।
। दि. 8 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## इयत्ता बारावीच्या 2024- 25 या वर्षाच्या परीक्षेत

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

### शिक्षण विश्व: विद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या मार्फत घेतल्या गेलेल्या इयत्ता बारावीच्या शैक्षणिक वर्ष २०२४- २५ या वर्षाच्या परीक्षेत चिंचवड येथील कमला एज्यूकेशन सोसायटी संचलीत प्रतिभा ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त केले.**





सालाबाद प्रमाणे या वर्षीही प्रतिभा ज्युनिअर कॉलेजचा विज्ञान, वाणिज्य व कला शाखेचा निकाल एकूण निकाल 96 टक्के लागला. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, अध्यक्षा प्रतिभा शहा, संचालिका डॉ.तेजल शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा , प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, तसेच संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यानी यशस्वी व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कला शाखेतून प्रथम क्रमाक सानिका नवनाथ मापरे 94.83 टक्के गुण प्राप्त करुन पटकाविला .वाणिज्य शाखेतून प्रथम क्रमांक शिवम कमलाकर गुंजाळ यांने 93.44 टक्के गुण प्राप्त करुन मिळविला ,तर विज्ञान शाखेतून अंबर गिरीश चाकवते 93.83 टक्के गुण प्राप्त करुन प्रथम आला . सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या काव्य वाचनाला उत्स्फूर्त प्रतिसाद!

### शिक्षण विश्व: प्रा रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।



आकुर्डीतील प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी काव्यवाचन स्पर्धेत सहभाग नोंदवला. थरमॅक्स चौक येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिव्यांग हॉस्टेल संस्थापक सुनील चोरडिया यांनी सुरू केले आहे. दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी दिव्यांग सेंटरची निर्मिती करण्यात आली आहे. या सेंटरचे प्रमुख श्री सुनील चोरडिया यांनी दिव्यांगांसाठी राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन नुकतेच केले होते. राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यापूर्वी दिव्यांगमूर्ती हेलन केलन आणि लूस ब्रेल यांच्या प्रतिमांचे पूजन कवयित्री सुलभा साईनाथ सत्तुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांनी पहलगाम येथील पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. दिव्यांग मुलांसाठी हे सेंटर सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याचे नमूद करून त्यांच्या सोयी सुविधांसाठी हे सेंटर प्रयत्नशील असल्याचा उल्लेख केला. 1991 मध्ये या सेंटरची स्थापना झाली असे या सेंटरचे उपाध्यक्ष किसन खंडागळे यांनी सांगितले. अंध विद्यार्थ्यांची साहित्याची भुक भागविण्यासाठी हे सेंटर साहित्याची निर्मिती देखील करत आहे असे नमूद केले.

साहित्यदर्शनातून दिव्यांग आणि प्रेरणा घेऊन पुढे जाण्याची गरज आहे, असे आत्मविश्वासाने सुनील चोरडिया यांनी सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्रातून नांदेड, जालना,जळगाव, मुंबई ,कोल्हापूर, अमरावती,अहिल्यानगर, धुळे ,पुणे, नाशिक, अकोला ,छ. संभाजी नगर अशा विविध ठिकाणाहून दिव्यांगांनी काव्य स्पर्धेत सहभाग नोंदवला. 26 विद्यार्थ्यांनी आपल्याद्वारे रचित काव्यवाचन केले. या कार्यक्रमाला 75 दिव्यांग मुलांनी उपस्थिती नोंदवली. याप्रसंगी प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. एम. बी. राठोड यांच्या हस्ते क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

तसेच प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी नितीन खरात, दिनेश वाघ, सुप्रिया मोरे, भिकाजी लोहकरे, राजेश आमले, उषा पुंडे, समीक्षा निकाळजे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अनिल शिंदे, किसन खंडागळे उपस्थित होते.


Admission Open
Moraya Shikshan Sanstha
“यत् भावो – तत् भवति”
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292